# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
## (सकाळ)

जा.क्र. ३३८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०३/०७/२०१८

**१) ट्रकची चोरी : –**

दिनांक ०१/०७/२०१८ ते ०२/०७/२०१८ चे २३.३० वा ते ०६.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी आयशा महबुब शेख वय ५६ वर्ष, रा. बॅक ऑफ इंडियाच्या मागे लाखनी याचा १ टाटा कंपनीचा ट्रक क्र. एम.एच. ४० वाय ४०९७ दसचक्का पांढरा– कथ्था रंगाचा किंमती अंदाजे ५,००,०००/–रु. ची एनएच–६ चे सर्विस रोड लाखनीचे बाजुला उभा ठेवला असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन विवाहीतेला शारिरीक व मानसिक त्रास देवुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक ०२/०५/२०१४ ते आज पर्यत यातील आरोपी क्र. १ ते ४ यांनी संगनमत करुन फिर्यादीस तिचे वडीलांकडुन २,००,०००/–रु. आण म्हणुन शारिरीक व मानसिक त्रास दिला तसेच आरोपी क्र. २ यांनी फिर्यादी अश्लिल कृत्य करुन तिचा विनयभंग केला असुन याबाबत फिर्यादीने त्यांना हटकले असता आरोपी क्र. १ ते ३ यांनी तिला मारहान करुन कोणालाही सांगीतले तर तुला जिवाने मारुन टाकीन अशी धमकी दिल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ४९८(अ), ३५४,५०६, ३४ भादवी. सहकलम ३,४ हुंडा प्रतिबंधक कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**३) जबरीने हिसकावुन नगदी पैसे व पासबुक चोरुन पळुन गेल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक ०१/०७/२०१८ चे २२.१५ ते २२.४५ वाजता दरम्यान यातील दोन अनोहखी इसमांनी संगनमत करुन फिर्यादी हा मोटार सायकलने जात असता त्याची मोटार सायकल थांबवुन हॅडलला लटकवलेली कापडी पिशवी मध्ये नगदी ४०,०००/–रु. व बॅकेची पासबुक असलेली जबरीने हिसकावुन घेवुन पळुन गेल्याने फिर्यादी महेशकुमार घनश्याामदास खानवानी वय ४० वर्ष रा. सिंधी कॉलोनी भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३९२, ३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गदादे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) संगनमत करुन सोन्याचे दागीणे व नगदी पैश्याची चोरुन नेल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक ०२/०७/२०१८ चे ०२.०० वाजता दरम्यान यातील अनोळखी इसम आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे घराचे समोरील हॉलचा दाराजवळ असलेल्या खिडकीतुन लोखंडी रॉड आतमध्ये टाकुन दाराचा कोंडा उघडून आत प्रवेश करुन बेडरुम मधील आलमारीमध्ये ठेवलेले सामान १ जोड सोन्याचे टॉप्स वजन ६ ग्रॅम, सोन्याचा पदक वजन २.५ ग्रॅम, सोन्याचे लॉकेट व पिटीव मनी वजन ४.५ ग्रॅम, पॅनटचे खिशामधील नगदी ६,०००/–रु. असा एकुण ३७,२००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी नंदलाल मारोती मेश्राम वय ५० वर्ष, रा. गंगा नगर खात रोड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५७,३८०,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) अज्ञात मारोती वाहन चालकांच्या धडकेत एक जखमी : —**

दिनांक ०१/०७/२०१८ चे २०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा मावस भाऊ जखमी सुबोध सिधार्थ टेंभुर्णे वय २४ वर्ष, रा. मांडवी हा त्याचे पल्सर मोटार सायकलने त्याचे गावी मांडवी येथे जात असता धारगाव एनएच —६ रोड येथे लाखनी कडुन येणाऱ्या आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मारोती पांढरी रंगाची कार ही लापरवाहीने, हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे जखमी भावाचे मोटार सायकलला धारगांव येथे धडक दिल्याने गंभीर जखमी होवुन उजवे पाय फॅक्चर करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी सुरेंद्र सुदाम वालदे वय ४० वर्ष, रा. वाघबोडी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४, १३४/१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नान्हे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**६) मारोती ओमणी गाडीचे धडकेत एक जखमी : —**

दिनांक ०२/०७/२०१८ चे १७.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादीचे वडील हे भंडारा येथे शेतीचे बियाणे घेण्याकरीता गेले होते नमुद घटना ता. वेळी ठिकाणी जखमी नामदेव सिरसाम यांना यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन लापरवाहीने चालवुन फिर्यादीचे वडीलास कोकनागड फाटा येथे धडक दिल्याने जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी शामकुमार नामदेव सिरसाम वय ३८ वर्ष, रा. कोकणागड ता. जि. भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४, १३४/१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नान्हे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**७)मोटार सायकलची चोरी : —**

दिनांक ०२/०७/२०१८ ते १४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी माधोराव शिवाजी सावरबांधे वय ६० वर्ष रा. आसगांव हे त्याचे मोटार सायकल क्र. एमएच ३६ ई ११२४ किंमती ३०,०००/—रु. मुंडले मेडीकल बाजार चौक पवनी जवळ ठेवुन महिला समुपदेशन पवनी येथे मुलीचे पेशी करिता आले तेथे तक्रारीचे निवारण करुन मोटार सायकल जवळ जावुन पाहीले असता दिसली नसल्याने कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**८) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु : —**

दिंनाक ०२/०७/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील मृतक भारत नारायण शेंडे वय ३७ वर्ष रा. गांधी वार्ड बेला याची अचानक प्रकृती खराब झाल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे आकस्मिक विभागात आणले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो व मृतकचे बयाण वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कन्नाके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**९) नदीच्या पात्रात बुडुन युवकाचा मृत्यु : —**

दिंनाक ०१/०७/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील मृतक कुणाल कल्याण साखरे वय २७ वर्ष, रा. लालालजपतराय वार्ड भंडारा हा आपले मित्रासह कोंरभी येथे दिनांक ०१/०७/२०१८ रोजी ११.०० पार्टी करण्या करीता गेला असतांना अंदाजे १६.०० वाजता दरम्यान वैनगंगा नदीपात्रात पोहण्या करिता गेला होता परंतु मृतक हा नदीच्या पाण्यात बुडुन मरण पावल्याने आज दिनांक ०२/०७/२०१८ चे २०.०० वाजात दरम्यान नदी पात्रात प्रेत पाण्यात तरंगत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादी सुरज कल्याण साखरे वय २४ वर्ष, रा. लालालजपतराय वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

१०) गळफास लावुन युवकाचा मृत्यु : –

दिंनाक ०२/०७/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील मृतक जितेंद्र विनायक कारेमोरे वय २५ वर्ष, रा. २५ वर्ष रा. पिपरी पुर्नवसन हा अंदाजे ५ वर्षा पासुन मानसिक रुग्न असल्याने त्याचे औषधोपचार सुरु असतांनी मृतकने आपले घरी त्याचे खोलीच्या आतील दार बंद करुन गळयाल दोराच्या सहयाने पंखाल्या अडकुन गळफास लावुन मृत पावलेल्या स्थितीत खिडकीतुन दिसुन आल्याने फिर्यादी लहु टिकारामजी कारेमोरे वय ३६ वर्ष, रा. पिपरी पुर्नवसन यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १७४ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

११) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक ०२/०६/२०१८ चे १७.३० ते १८.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटा मॅक्स वाहन हे जुना बस स्टॉप चौक तुमसर येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभा करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. भुते यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. भुते पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

१२) अवैध हातभट्टी दारू अडड्यांवर धाडी . :–

दिनांक ०२/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन मोहाडी येथे अवैध हातभट्टी दारू अडड्यावर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हा दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५ लिटर हातभट्टी दारू किंमती ५००/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

१३) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०२/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी २, तीन सिटर वाहनाकरीता– ०६ ईतर वाहनांवरती – ९६ केसेस करण्यात आले आहे.

(सपोनी एच. एम रायपुरे)
पोलीस नियत्रंण कक्ष अधीकारी भंडारा
दुरध्वनी.क्र.९९७०७३२०७९

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता